MHKO070009962014

नियमीत दिवाणी दावा क्रमांक १६८/२०१४
CNR No. -MHKO070009962014

निशाणी २६ वरील आदेश

नामदेव धोंडीबा चव्हाण – वादी

वि.

संजय मारुती पाटील – प्रतिवादी

१. प्रस्तुतचा दावा खरेदीपत्र पूर्ण होवून मिळणेसाठी व कायम मनाईसाठीचा असून वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यातील नि. ५ चा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर झालेला आहे. प्रस्तुत दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादींनी याच न्यायालयात रे.क.नं. १४५/२०१४ चा मनाईचा दावा दाखल केला होता तो काढून टाकलेला आहे. त्यासंबंधीचे तथ्य अभिलेखावर येणे करीता दुरुस्ती करणे आवश्यक आहे सदरची दुरुस्ती प्रस्तुतचा दावा दाखल झालेनंतर घडलेल्या वस्तुस्थितीबाबत आहे. कैफियतीमध्ये रे.क.नं. १४५/२०१४ चा दावा दाखल केलेबाबत बचावात्मक कथन केलेले आहे. प्रस्तावीत दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही. म्हणून त्याने प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी मिळणे विषयी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने म्हणणे देवून अर्जास विरोध केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने रे.क.नं. १४५/२०१४ दावेबद्दल मागितलेली दुरुस्ती ही प्लीडींगचा भाग होत नसलेने अशा स्वरुपाची दुरुस्ती कायदयाप्रमाणे मागता येत नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती प्रतिवादीने केली आहे.

४. उभय पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत कामी अदयापी पुरावा सुरु होणेचा आहे. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकनावरुन ती फॉर्मल स्वरुपाची असून त्यामुळे दावेतील स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नसल्याचे दिसून येते. त्यामुळे उभय पक्षकारांमधील वादाचे अंतिमतः निराकरण करणेसाठी प्रस्तुतच्या दुरुस्तीस परवानगी देणे योग्य वाटते.

६. तथापी, वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा दाखल झालेनंतर जवळपास चार वर्षाने दाखल केला आहे. किंबहुणा अशी दुरुस्ती ते यापूर्वीही करु शकले असते, परंतु वादीने तसे केलेले नाही. त्यामुळे त्याबाबत वादीवर कॉस्टस् बसविणे योग्य वाटते.

७. वरील सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश करणेत येतो –

प्रतिवादीला रक्कम रुपये ५००/– (रुपये पाचशे फक्त )
कॉस्ट देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करणेत येतो.

Sd/-

जयसिंगपूर. (ए. एम. पाटील)
दिनांकः ११/०२/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जयसिंगपूर.